**महाराष्ट्र शासन**
**प्राथमिक शिक्षण संचालनालय,**
डॉ.अनी बेझंट मार्ग, मध्यवर्ती इमारत, पुणे-४११००१
दू.क्र.(०२०)२६१२५६९२ ई-मेल :- depmah2@gmail.com

क्र.प्राशिसं/संकीर्ण-८०२/School Bag Policy-२०२०/२०२६ दिनांक / ०८ / २०२६

प्रति,

१) विभागीय शिक्षण उपसंचालक (सर्व)
२) शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परीषद (सर्व)
३) शिक्षणाधिकारी/प्रशासन अधिकारी, महानगरपालिका (सर्व)
४) शिक्षण निरीक्षक (दक्षिण / पश्चिम / उत्तर), बृहन्मुंबई

**विषय :- School Bag Policy, २०२० ची शाळांमध्ये प्रभावी अंमलबजावणी करण्याबाबत**

**संदर्भ** :- १. भारत सरकार, शिक्षण मंत्रालय, Department of School Education & Literacy यांचे पत्र क्र. F.No.१-४/२०१८-IS-३, दि. ११ मे, २०२६
२. भारत सरकार, शिक्षण मंत्रालय, Department of School Education & Literacy यांचे पत्र क्र. F.No.१-४/२०१८-IS-३, दि. २४.११.२०२०
३. National Council of Educational Research and Training (NCERT) यांची Policy on School Bag-२०२०

उपरोक्त संदर्भीय School Bag Policy, २०२० धोरणानुसार, विदयार्थ्यांच्या शालेय दप्तराचे वजन कमी करणे, विदयार्थ्यांच्या आरोग्यावर होणारे दुष्परिणाम टाळणे तसेच अध्ययन-अध्यापन प्रक्रिया अधिक आनंददायी व कृतीप्रधान करणे आवश्यक आहे. सदर धोरणाची अंमलबजावणी आपल्या कार्यक्षेत्रातील सर्व शाळांमध्ये प्रभावीपणे होण्यासाठी खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

**१. शाळांच्या मुख्याध्यापकांना स्पष्ट सूचना -** आपल्या अधिनस्त सर्व शासकीय, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या तसेच मान्यताप्राप्त खासगी शाळांच्या मुख्याध्यापकांना School Bag Policy, २०२० मधील तरतुदींची माहिती देऊन त्यांचे काटेकोर पालन करण्याच्या सूचना देण्यात याव्यात.

**२. दप्तराचे वजन -** विदयार्थ्यांच्या शारीरिक वजनाच्या साधारणतः **१० टक्क्यांपेक्षा अधिक दप्तराचे वजन होणार नाही**, याची दक्षता शाळांनी घ्यावी. धोरणामध्ये वर्गनिहाय विदयार्थी वजन व अपेक्षित दप्तर वजनाचा मार्गदर्शक तक्ता देण्यात आलेला आहे.

शाळांनी विदयार्थ्यांचे व दप्तराचे वजन वेळोवेळी तपासून नोंद ठेवावी व ज्या विदयार्थ्यांचे दप्तर निर्धारित मर्यादेपेक्षा अधिक आहे, त्याबाबत तात्काळ योग्य कार्यवाही करावी.

**३. पूर्व-प्राथमिक स्तर** - पूर्व-प्राथमिक वर्गातील विदयार्थ्यांना शक्यतो **शाळेत दप्तर आणण्याची आवश्यकता राहणार नाही**, याबाबत शाळांनी नियोजन करावे.

**४. पाठ्यपुस्तके व वह्यांची संख्या** - मुख्याध्यापक व शिक्षकांनी विदयार्थ्यांना अनावश्यक पाठ्यपुस्तके, वह्या, कार्यपुस्तिका किंवा इतर साहित्य दररोज शाळेत आणण्यास सांगू नये.

दैनंदिन वेळापत्रकानुसार त्या दिवसासाठी आवश्यक असलेलीच पुस्तके व शैक्षणिक साहित्य विदयार्थ्यांनी आणावे, यासाठी वर्गनिहाय **दप्तर वेळापत्रक (Bag Timetable)** तयार करावे.

**५. शाळेत पुस्तके ठेवण्याची व्यवस्था** - शक्य असल्यास शाळांनी विदयार्थ्यांसाठी वर्गनिहाय कपाटे, शेल्फ, लॉकर किंवा पुस्तके ठेवण्याची अन्य सुरक्षित व्यवस्था उपलब्ध करून द्यावी, जेणेकरून दररोज सर्व पुस्तके घरी नेण्याची आवश्यकता राहणार नाही.

**६. पिण्याच्या पाण्याची व्यवस्था** - शाळेत स्वच्छ व सुरक्षित पिण्याचे पाणी उपलब्ध असल्यास विदयार्थ्यांना अनावश्यकपणे जड पाण्याची बाटली आणण्याची आवश्यकता राहणार नाही. त्यामुळे शाळेतील पिण्याच्या पाण्याची सुविधा कार्यरत व पुरेशी असल्याची खात्री करावी.

**७. वेळापत्रकाचे नियोजन** - शाळेचे साप्ताहिक वेळापत्रक तयार करताना एकाच दिवशी विदयार्थ्यांना जास्तीत जास्त पुस्तके व वह्या आणाव्या लागणार नाहीत, याची दक्षता घ्यावी.

विषय शिक्षकांनी आपापल्या विषयासाठी आवश्यक साहित्याची संख्या कमी ठेवून शक्य तितक्या कृतीप्रधान व अनुभवाधारित अध्यापन पद्धतीचा वापर करावा.

**८. गृहपाठ व शैक्षणिक साहित्य** - विदयार्थ्यांना अनावश्यक लिखित गृहपाठ, अतिरिक्त वह्या, प्रकल्प साहित्य किंवा इतर साहित्य आणण्यास सांगून दप्तराचे वजन वाढणार नाही, याची दक्षता घ्यावी.

**९. Bagless Days / दप्तरविरहित दिवस**

इयत्ता ६ वी ते ८ वीच्या विद्यार्थ्यांसाठी NEP २०२० व School Bag Policy, २०२० नुसार **१० दिवसांचा दप्तरविरहित कालावधी** नियोजित करून स्थानिक पातळीवरील कारागीर, व्यावसायिक व कौशल्याधारित व्यक्तींच्या मार्गदर्शनाखाली प्रत्यक्ष अनुभवाधारित उपक्रम राबवावेत.

यामध्ये सुतारकाम, बागकाम, मातीची भांडी बनविणे, हस्तकला, कला, स्थानिक व्यवसाय, कृषीविषयक उपक्रम इत्यादींचा समावेश करता येईल. केंद्र शासनाने इयत्ता ६ ते ८ मध्ये अशा १० दिवसांच्या bagless period ला विशेष प्रोत्साहन दिले आहे.

**१०. दप्तरविरहित उपक्रम** - शाळांनी वर्षभरात नियोजनपूर्वक खालीलप्रमाणे दप्तरविरहित/कृतीप्रधान दिवस आयोजित करावेत :-

- कला व हस्तकला उपक्रम
- क्रीडा व शारीरिक शिक्षण
- प्रश्नमंजुषा व बौद्धिक खेळ
- वाचन व कथाकथन
- स्थानिक कला व संस्कृती
- व्यावसायिक कौशल्यांची ओळख
- परिसर अभ्यास व क्षेत्रभेट
- बागकाम व पर्यावरण संवर्धन
- स्थानिक कारागीर/तज्ज्ञांशी संवाद.

**११. विद्यार्थ्यांच्या आरोग्याची काळजी** - दप्तराचे जास्त वजन विद्यार्थ्यांच्या पाठीचा कणा, खांदे व शरीराच्या वाढीवर विपरीत परिणाम करू शकते. त्यामुळे मुख्याध्यापकांनी शिक्षक, पालक व विदयार्थ्यांमध्ये दप्तराच्या योग्य वजनाबाबत जनजागृती करावी.

विशेष गरजा असलेल्या विदयार्थ्यांसाठी त्यांच्या शारीरिक गरजा लक्षात घेऊन आवश्यक सवलती व पर्यायी व्यवस्था करावी.

**१२. पालकांची भूमिका** - पालक सभांमध्ये School Bag Policy, २०२० बाबत माहिती देऊन विदयार्थ्यांच्या दप्तरात अनावश्यक वस्तू ठेवू नयेत, तसेच शाळेने निर्धारित केलेल्या वेळापत्रकानुसारच पुस्तके व साहित्य पाठवावे, याबाबत मार्गदर्शन करावे.

**१३. अचानक तपासणी** - शिक्षणाधिकारी, गटशिक्षणाधिकारी, शिक्षण विस्तार अधिकारी व केंद्रप्रमुख यांनी शाळांच्या भेटीदरम्यान विदयार्थ्यांच्या दप्तराचे वजन तपासावे.

तपासणीदरम्यान खालील बाबींची विशेष पडताळणी करावी :-

१. विदयार्थ्यांच्या वजनाच्या तुलनेत दप्तराचे वजन.
२. वर्गनिहाय पुस्तके व वह्यांची संख्या.
३. दप्तर वेळापत्रकाची अंमलबजावणी.
४. शाळेत पुस्तके ठेवण्याची व्यवस्था.
५. पिण्याच्या पाण्याची सुविधा.
६. दप्तरविरहित दिवसांचे आयोजन.
७. इयत्ता ६ वी ते ८ वी तील १० दिवसांच्या bagless period ची अंमलबजावणी.
८. पालकांना दिलेले मार्गदर्शन.
९. शाळेने ठेवलेली दप्तर वजन तपासणी नोंदवही.

**१४. अहवाल व नोंद** - प्रत्येक शाळेने School Bag Policy, २०२० च्या अंमलबजावणीबाबत स्वतंत्र नोंद ठेवावी. गटशिक्षणाधिकारी यांनी शाळानिहाय अनुपालनाची माहिती संकलित करून शिक्षणाधिकारी यांच्याकडे सादर करावी.

**१५. जबाबदारी निश्चित करणे** - School Bag Policy, २०२० ची प्रभावी अंमलबजावणी करण्याची प्राथमिक जबाबदारी संबंधित शाळेच्या मुख्याध्यापकांची राहील. गटशिक्षणाधिकारी व क्षेत्रीय अधिकारी यांनी नियमितपणे देखरेख करून अनियमितता आढळल्यास संबंधित शाळेला आवश्यक त्या सूचना देऊन अनुपालन सुनिश्चित करावे.

**१६. अनुपालन अहवाल** - सर्व शिक्षणाधिकारी यांनी आपल्या कार्यक्षेत्रातील शाळांमध्ये सदर धोरणाची अंमलबजावणी झाल्याबाबत **शाळानिहाय अनुपालन अहवाल** प्राप्त करून त्याचा आढावा घ्यावा व आवश्यकतेनुसार संकलित अहवाल वरिष्ठ कार्यालयास सादर करावा.

**वरील सूचनांची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यात यावी. विदयार्थ्यांच्या आरोग्य, सुरक्षितता व सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने School Bag Policy, २०२० मधील तरतुदींचे पालन करण्यास कोणतीही दिरंगाई होणार नाही, याची दक्षता घ्यावी.**

Digitally signed by
SHARAD SHANKARGIRI GOSAVI
Date: 31-08-2026 14:30:15

**( शरद गोसावी )**
शिक्षण संचालक (प्राथमिक),
महाराष्ट्र राज्य, पुणे